# ePaper नागालँड राष्ट्रवादीच्या सात आमदारांचा अजित पवारांना पाठिंबा




| वर्ष - 7 | अंक - 80 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


**आतील पानांत**


- पुण्यातील ३५५ शाळा दोन दिवस बंद
- 'रोल मॉडेल' प्रकल्पांचा 'श्रीगणेशा'!
- इर्शाळवाडीवर दुःखाचा डोंगर
- प्रत्येक वेळी शिक्षा महिलांनाच का ?



www.mahaenews.com | शुक्रवार , दिनांक 21 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


# पिंपळे सौदागरमध्ये भूस्खलन!

## » रस्ता खचला : जलवाहिनी तुटली, प्रशासनाचे युद्ध पातळीवर मदतकार्य



।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपळे सौदागर येथील कुणाल आयकॉन रोडवर नवीन बांधकाम चालु असलेल्या ठिकाणी झालेल्या भूस्खलनामुळे जलवाहिनी तुटली. पाणीपुरवठा विभागाने युद्ध पातळीवर या वाहिनीच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले असून रात्री उशिरापर्यंत हे काम पूर्ण होईल, असे पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अजय सूर्यवंशी यांनी सांगितले आहे.**

हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील नागरिकांनी सतर्क रहावे अशा सूचना देखील महापालिकेच्या वतीने देण्यात आल्या आहेत. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास महापालिकेच्या नियंत्रण कक्षास माहिती द्यावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. दि २० जुलै रोजी पहाटे पिंपळे सौदागर परिसरातील एका बांधकाम चालू असलेल्या साइटवर भुस्खलन होवुन रस्ता खचला असल्याची माहिती महापालिकेला मिळाली. या भागात असलेली जलवाहिनी आणि जलनि:सारणवाहिनी यामुळे बाधित झाली. सूचना मिळाल्यानंतर महापालिकेचे पथक घटनास्थळी दाखल झाले.



**माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांची सतर्कता...**

**» दरम्यान, पहाटे व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांनी व परिसरातील सोसायटीधारकांनी ही घटना माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांना कळवली. यावर त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित बांधकाम व्यावसायिक, मनपा अधिकारी, पाणी पुरवठा विभाग व पोलीस प्रशासनाला सूचना केल्या. त्वरीत उपायोजना करण्यास सांगितले. त्यानुसार पोलीस व मनपा विभाग यांना सुरक्षा जाळी लावली आहे. तसेच, मनपा विभाग, पाणी पुरवठा विभागातर्फे पाईप लाईन व रस्ता दुरूस्ती करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.**

### संबंधित बिल्डरला सूचना...

घटनास्थळी भेट दिल्यानंतर सहशहर अभियंता डॉ.ज्ञानदेव जुंधारे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, कुणाल आयकॉन रोडवर सुखवानी रामचंदानी एलएलपी बिल्डरच्या व्यावसायिक आणि निवासी इमारतीची ही जागा आहे. तळघरासाठी खोदकाम केल्यामुळे ५० मीटर लांबीचा आणि साधारणपणे तीन मीटर रुंदीचा रस्ता कोसळला आहे. वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक श्री गोकुळे यांच्या समवेत या भागाची संयुक्त पाहणी केली आहे. या मार्गावरील वाहतुकीला सद्यस्थितीत कोणतीही अडचण नसून वाहतूक सुरळीत सुरू आहे. संबंधित बिल्डरला खचलेला भूभाग भरण्यास आणि त्या ठिकाणी सुरक्षा रक्षक ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

### पाणी पुरवठा सुरळीत होईल...

दरम्यान, या ठिकाणी बॅरीकेटींग करण्यात आले आहे. आयुक्त शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी परिस्थितीची माहिती घेतली असून बाधित झालेला पाणीपुरवठा वेळेत सुरू करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत. सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, कार्यकारी अभियंता अजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा विभागातर्फे जलवाहिनी दुरूस्तीचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. रात्री उशिरापर्यंत हे काम पूर्ण होईल. या भागातील पाणीपुरवठा सुरळीत केला जाईल, असे पाणीपुरवठा विभागाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# पुण्यातील 355 शाळा दोन दिवस बंद

## » सर्व विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक

### » घाट भागात खबरदारीचा उपाय 355 शाळा बंद

। पुणे/ जेजुरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यासह राज्यभरात मोठ्या प्रमाणात पावसामुळे (SCHOOL) नुकसान झालं आहे. त्यातच अनुचित काही घडू नये म्हणून पुण्यातील दुर्गम भागातील शाळा आज आणि उद्या असे दोन दिवस बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आज (20 जुलै) आणि उद्या (21 जुलै) ला आंबेगाव, खेड, जुन्नर, भोर, पुरंदर, मुळशी, मावळ या तालुक्यातील अवघड क्षेत्रातील 355 शाळा आज आणि उद्या बंद ठेवण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश आहेत.**



जिल्हादंडाधिकारी आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. राजेश देशमुख यांनी काल रात्री घाट भागात झालेल्या पावसामुळे खबरदारीचा उपाय म्हणून आज (गुरुवार 20 जुलै) आणि उद्या (शुक्रवार 21 जुलै) दुर्गम भागात असलेल्या शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या भागातील अंगणवाड्याही आज आणि उद्या बंद ठेवल्या जाणार आहेत. ब्लॉक एज्युकेशन ऑफिसर आणि सीडीपीओ यांनी परिसरात असणे आणि सर्व विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करणे आवश्यक आहे. शिक्षक आणि मुख्याध्यापक शाळेत उपस्थित राहतील. हा आदेश अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद, सर्व मंडळांशी संलग्न अनुदानित आणि खाजगी शाळांना लागू आहे. इतर सर्व भागातील शाळा आणि अंगणवाड्या सामान्यपणे चालू राहतील. लोणावळ्यात आज आठ तासांतच 100 मिमी पावसाची नोंद झाली आणि काल सायंकाळ नंतर ही पावसाचा जोर कायमच होता. हे पाहता आज, उद्या शहरातील शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. गेल्या दोन दिवसांत 434 मिमी पावसाची नोंद झाली होती. अशातच तिसऱ्या दिवशी पावसाने आणखी जोर धरला आहे. त्यामुळेच खबरदारीचा उपाय म्हणून उद्या सर्व शाळा-महाविद्यालयांना सुट्टी देण्यात आली आहे. उद्या पावसाची परिस्थिती पाहून पुढचा निर्णय घेतला जाईल.

### जिल्ह्यात 23 गावे दरडप्रवण

» मंगळवारपासून घाटमाथ्यावरही पाऊस पडत आहे. पुणे जिल्ह्यात 23 गावे दरडप्रवण आणि 84 पूरप्रवण गावे आहेत. दरडप्रवण गावात दरडी कोसळण्याची शक्यता तसेच पूरप्रवण भागात पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मुख्यालय सोडू नये. आपल्या भागात घटना घडल्यास तात्काळ नियंत्रण कक्षास कळवावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केलं आहे.

---

# २० रुपयात पोटभर खा

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।



रेल्वेने आता प्रवाशांना स्वस्तात जेवण देण्यास सुरूवात केली आहे. सर्वसाधारण डब्यांसमोर अतिशय कमी दरात प्रवाशांना जेवण दिले जात आहे. याची सुरूवात पुण्यासह देशभरातील ६४ रेल्वे स्थानकांवर झाली आहे. याचबरोबर पिण्याचे पाणीही प्रवाशांना माफक दरात उपलब्ध करून दिले जात आहे. रेल्वे मंडळाने परडवणाऱ्या दरात प्रवाशांना जेवण उपलब्ध करुन देण्याचे आदेश रेल्वेच्या सर्व विभागांना दिले होते. रेल्वे स्थानकावर सर्वसाधारण डबे जिथे थांबतात त्या ठिकाणी फलाटावर ही सुविधा देण्यास सांगण्यात आले होते. प्रायोगिक तत्वावर ही सुविधा सहा महिने चालवावी, असेही निर्देश देण्यात आले होते. यानुसार, आयआरसीटीसीकडे या योजनेची अंमलबजावणी देण्यात आली. यानुसार पुणे स्थानकावर ही सुविधा सुरू झाली आहे. आता रेल्वे प्रवाशांना फलाटावरच २० व ५० रूपयांत पोटभर जेवण मिळच आहे. दक्षिण भारतीय भात, राजमा अथवा छोले आणि भात, खिचडी, छोले आणि भटुरे अथवा कुलचे, पाव भाजी, मसाला डोसा (यापैकी एक पदार्थ) याचबरोबर त्यांना २ रुपयांत दोनशे मिली पाणीही मिळत आहे. सध्या मध्य रेल्वेच्या पुण्यासह नागपूर, भुसावळ, मनमाड, लोकमान्य टिळक टर्मिनस आणि खांडवा स्थानकावर ही सुविधा सुरू झाली आहे. आगामी काळात इतर स्थानकांवर ही सुविझा सुरू केली जाणार आहे, अशी माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ.रामदास भिसे यांनी दिली.

# दूध भेसळ केल्याचे कारवाई

## » अपर जिल्हाधिकारी अजय मोरे यांचा इशारा

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दूधात होणारी भेसळ रोखण्यासाठी तसेच दूध भेसळीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी अजय मोरे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठकीचे जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले. दूध भेसळ केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितावर कठोर कारवाई करण्यात येईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. .**



बैठकीस अपर पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण डॉ. मितेश घट्टे, सहायक आयुक्त अन्न व औषध एस. ए. गवते, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. अंकुश परिहार, जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी एस. के. डोईफोडे, उपनियंत्रक वैध मापन शास्त्र बी. जी. महाजन आदी उपस्थित होते. बैठकीत मोरे म्हणाले, दूध आपल्या दैनंदिन आहाराचा एक अविभाज्य भाग व महत्त्वपूर्ण पोषक तत्वांचा स्रोत असून चांगलं आरोग्य राखण्यास महत्वपुर्ण भूमिका बजावते.

हानीकारक पदार्थासह दुधात भेसळ केल्याने ग्राहकाच्या आरोग्यावर मोठा धोका निर्माण होतो. काही समाजकंटक व्यक्ती दूध भेसळ करण्यासाठी आणि नफा वाढविण्यासाठी त्याची गुणवत्ता आणि सुरक्षेशी तडजोड करुन विविध फसव्या पद्धतींचा वापर करत आहेत, ही बाब चिंतेची असून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे आहे. दूध भेसळीमध्ये सामान्यपणे पाणी, क्रीम मिल्क पावडर, वनस्पती तेल, स्टार्च, युरिया, डिटर्जंटस आणि इतर रसायनांचा समावेश करतात.

दूध भेसळीमुळे मानवी शारीरिक समस्या, पचन, ॲलर्जी आणि दीर्घकालीन अवयवाचे नुकसान या सारख्या गंभीर आरोग्य समस्या होऊ शकतात. पुणे जिल्ह्यातील दूध संकलन स्वीकृती केंद्र, जिल्ह्यातील/ जिल्ह्याबाहेरील व परराज्यातून येणाऱ्या दूधाचे नमुने तसेच तसेच सहकारी व खाजगी क्षेत्रातील दूध संकलन व प्रक्रिया केंद्रावरील (डेअरी) नमुने यांची तपासणी अन्न औषध प्रशासन विभागाने दरमहा करावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

### पालकमंत्रिपदाचा निर्णय आज?

» दूध भेसळीबाबत समाजामध्ये जागरुकता निर्माण होणे आवश्यक आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थ भेसळीत सहभागी असणाऱ्या व्यक्ती व डेअरी विरोधात प्रथम खबरी अहवाल नोंदवून भेसळीबाबत आढळून आलेल्या कसूरदारांवर कठोर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे डॉ. घट्टे यावेळी म्हणाले.नागरिकांना दूध भेसळ आढळल्यास अन्न व औषध विभागाचा टोल फ्री क्रमांक १८००२२२३६५ किंवा FDAPUNE2019@GMAIL.COM या ईमेलवर संपर्क करुन माहिती द्यावी. तक्रार देणाऱ्या व्यक्तीची माहिती गोपनीय ठेवली जाईल, असेही यावेळी सांगण्यात आले.


# 'रोल मॉडेल' प्रकल्पांचा 'श्रीगणेशा'!

## » पंतप्रधान मोदींच्या हस्ते उद्घाटन : दि. 1 ऑगस्टला मोदी पुणे दौऱ्यावर

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी- चिंचवड महापालिकेच्या मुळा नदी सुधार प्रकल्पाचे, मोशी कचरा डेपो येथील कचऱ्यापासून वीजनिर्मिती (वेस्ट टू एजन्सी) आणि बोयोमॉयनिंग या प्रकल्पांचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दि. १ ऑगस्टला करण्याचे नियोजन आहे. त्या संदर्भातील माहिती 'पीएमओ' कार्यालयास पाठविली आहे.**





पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने मुळा नदी सुधार प्रकल्प राबविला जात आहे. वाकड बायपास ते सांगवी पुलापर्यंत असे ८.८० किलोमीटर अंतराच्या नदी पात्राच्या एका बाजूचे काम पिंपरी-चिचवड महापालिका करीत आहे. त्यासाठी २७६ कोटी ५४ लाख खर्च आहे. या कामाचे भूमिपूजन पंतप्रधानाच्या हस्ते करण्याचे नियोजन आहे.

मोशी येथील कचरा डेपोमध्ये वेस्ट टू एनर्जी हा प्रकल्प उभारला आहे. वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाची चाचणी घेण्यात आली आहे. त्यात १.०० मेगावॅट वीज तयार केली आहे. हा प्रकल्प डीबीओटी तत्वावर २०८ कोटी ३६ लाख रुपये खर्च करूनउभारला आहे. प्रकल्पाचे काम पूर्ण होऊन प्रत्यक्ष वीजनिर्मिती सुरू केली डेपोत जमा झालेल्या ७०० टन सुक्या कचऱ्यापासून दररोज १४ मेगावॅट वीजनिर्मिती केली जाणार आहे. ती वीज प्रतियुनिट ५ रुपये दराने पालिका २० वर्षे विकत घेणार आहे. मैला सांडपाणी शुद्धीकरण केंद्र या ठिकाणी वापरणार आहे. त्यामुळे पालिकेच्या वीजबिलात सुमारे ३५ ते ४० टक्के बचत होईल, असा दावा करण्यात आला आहे. महावितरणांच्या यंत्रणेसोबत सुरू असेलेली प्रक्रिया अद्याप झालेली नाही. या प्रकल्पाचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटनाचे नियोजन आहे.

### आवास योजनेतील सदनिकांचाही 'मुहूर्त'

**» पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने पंतप्रधान आवास योजनेत बो-हाडेवाडी व चऱ्होली येथील गृहप्रकल्पांतील सदनिका तयार झाल्या आहेत. बो-हाडेवाडीचा प्रकल्प १०० टक्के तयार असून, चऱ्होलीतील ७ इमारती तयार आहेत. तेथील सदनिकांची चावी पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते लाभार्थ्यांना देण्याचे नियोजन आहे.**

### बायोमायनिंगमुळे कचऱ्याचे डोंगर हटले

» तसेच, ८१ एकर जागेतील कचरा डेपोत गेल्या २५ वर्षात जमा झालेल्या कचऱ्याचे मोठे मोठे डोंगर आहेत. ते काढून त्यांची विल्हेवाट लावली जात आहे. या बायोमायनिंगच्या पहिल्या टप्प्यात १४ एकर जागेतील कचरा काढण्याचे काम मार्च २०२१ ला सुरु झाले आहे. त्यासाठी ४२ कोटी खर्च करण्यात येत आहे. दुसऱ्या टप्प्यातील कामाचे उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रयत्नशील आहेत. त्यांनी त्याबाबत आयुक्त शेखर सिंह यांना सूचना केल्या.

### महापालिका प्रशासनाची तयारी...

» पंतप्रधान हे येत्या १ ऑगस्टला विविध कार्यक्रमांसाठी पुणे शहरात येत आहेत. त्यांच्या हस्ते पुणे जिल्ह्यातील या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन करण्याचे नियोजन आहे. याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेने वरील तीन प्रकल्पांची माहिती पीएमओ कार्यालयास पाठविली आहे. पुणे शहरातील प्रकल्पांसह पिंपरी-चिंचवड पालिकेच्या प्रकल्पाचे उद्घाटन मोदी यांच्या हस्ते होण्याची शक्यता आहे. त्यासाठी महापालिका तयारी करीत आहे, असे महापालिकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

# नैसर्गिक नाल्यांचे सर्वेक्षण!

## » तीनशे कोटींचा खर्च : स्वतंत्र आराखड्याचे नियोजन

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील जलनिस्सारण वाहिन्या (ड्रेनेज लाइन) जुन्या झाल्याने तुंबण्याचे प्रकार वाढत आहेत. त्यामुळे महापालिकेने या वाहिन्यांचे आणि नैसर्गिक नाल्यांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. जलनिस्सारण वाहिन्या अद्ययावत करण्यात येणार असून, त्यासाठी तीनशे कोटी रुपये खर्च केला जाणार आहे. या सर्वेक्षणानंतर वाहिन्या आणि नाल्यांचा स्वतंत्र आराखडा तयार करण्याचे नियोजन आहे.**



> केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयाच्या आदेशानुसार जलनिस्सारण वाहिन्या, नाल्यांचे सर्वेक्षण करण्यात येत आहे. त्यानंतर वाहिन्या, नाल्यांचे अद्ययावतीकरण करण्यात येईल. त्यासाठी ३०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. केंद्राचे अनुदानही मिळणार आहे. या कामामुळे जलप्रदूषण रोखणे शक्य होईल.
>
> **-संजय कुलकर्णी,**
> **सहशहर अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

पिंपरी-चिंचवड शहरात एक हजार ६०० किलोमीटर लांबीच्या जलनिस्सारण वाहिन्या, ५३ मोठे नैसर्गिक नाले आहेत. जलनिस्सारण वाहिन्या नगरपालिकेच्या काळातील ३५ वर्षांपूर्वीच्या आहेत. काही भागांत नव्याने वाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. गेल्या काही वर्षांत लोकवस्ती वाढल्याने सांडपाणी मोठ्या प्रमाणात तयार होते. मात्र, वाहिन्या जुन्याच असल्याने त्या तुंबण्याचे प्रकार सातत्याने वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर महापालिकेने मध्य प्रदेशातील इंदूरच्या धर्तीवर शहरातील सर्व जलनिस्सारण वाहिन्या आणि नाल्यांचे सर्वेक्षण हाती घेतले आहे. त्यासाठी खासगी संस्थेची नेमणूक करण्यात आली आहे. शहराचे चार भागांत विभाजन करून वर्षभरात सर्वेक्षणाचे काम पूर्ण करण्यात येईल. सर्वेक्षणासाठी संबंधित संस्थेला प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या दीड टक्के शुल्क दिले जाणार आहे.

सर्वेक्षणाच्या माध्यमातून जुन्या, नादुरुस्त वाहिन्या कोणत्या समजणार आहे. त्यामुळे सांडपाणी कोठे तुंबते, कशामुळे तुंबते याबरोबरच कोणत्या भागात अधिक क्षमतेच्या वाहिन्यांची गरज आहे हे स्पष्ट होणार आहे. सर्वेक्षण करणाऱ्या संस्थेकडून वाहिन्या आणि नाल्यांचा संपूर्ण आराखडा महापालिकेस सादर केला जाणार आहे. त्यानुसार महापालिका जलनिस्सारण वाहिन्या आणि नाल्यांचे काम करणार आहे.

# ई-पीक पाहणी अंतर्गत नोंदणी करा

। ऊर्से ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

राज्यात होणाऱ्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यासाठी पंतप्रधान पीक विमा योजना खरीप हंगाम २०२३-२४ मध्ये एक रुपयात पीक विमा योजनेची सद्यःस्थितीबाबत आढावा व तपासणी करण्यासाठी पुणे उपविभागीय कृषी अधिकारी सूरज मडके मावळ तालुक्याच्या दौऱ्यावर होते. शेतकऱ्यांनी त्वरित नुकसान भरपाई मिळावी, यासाठी ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन यावेळी त्यांनी केले. सोमाटणे, शिरगाव, ओव्हळे, काले, मळवंडी ठुले, खडकाळे महा ई सेवा केंद्रावर जाऊन पाहणी करून केंद्र चालक, शेतकरी, कृषी कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. दौऱ्यावेळी त्यांच्यासोबत तालुका कृषी अधिकारी दत्तात्रेय पडवळ, मंडळ कृषी अधिकारी प्रशांत डहाळे, कृषी पर्यवेक्षक नागनाथ शिंदे, मिनाज शेख, कृषी सहायक सुनील गायकवाड, विकास गोसावी, अक्षय ढुमणे आदी उपस्थित होते. मडके म्हणाले, "राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. त्यामुळे अशा प्रकारच्या योजनेतून शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळावी, हा या योजनेमागचा हेतू आहे. कर्जदार आणि बिगर कर्जदार शेतकरी त्यांच्या इच्छेनुसार यामध्ये सहभागी होऊ शकतात. नैसर्गिक आपत्ती व इतर कारणांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देणे हा उद्देश आहे. शेतकरी बांधवांनी ई पीक पाहणी अंतर्गत पिकाची नोंदणी करून घ्यावी.




# आधी मसुदा तर येऊ द्या..



**समान नागरी कायद्याच्या संबंधात २०१९ मध्ये न्या. बलवीर सिंग चौहान यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या २१ व्या कायदा आयोगाने आपल्या अहवालात स्पष्टपणे म्हटले आहे की, आताच्या घडीला समान नागरी कायदा करणे 'इष्टही नाही आणि आवश्यकताही नाही' (नायदर डिझायरेबल, नॉर नेसेसरी). त्यांनी कौटुंबिक कायद्यामध्ये सुधारणा करायला हरकत नाही, असे म्हटले आहे.**

पण त्यासाठी सर्व धार्मिक समूहांसाठी एकच कायदा बनवण्याची गरज नाही. या अहवालात सुचवल्याप्रमाणे काही सुधारणा घडवण्याऐवजी सर्वच समाजासाठी एकच-एक असा समान नागरी कायदा आणण्याच्या दृष्टीने सरकार आग्रही आहे. यातून समाजातील विविध घटकांना न्याय देण्याऐवजी आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीनेसमाजात फूट पाडायचा सरकारचा प्रयत्न आहे. राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो' यात्रेने देशभर वातावरण बदलले आहे. कर्नाटक निवडणुकीने भाजपला मोठा धक्का दिला आहे. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांची विपन्नावस्था, छोटय़ा उद्योगांवरचे आघात, महिलांवरील अत्याचार, विविध समाज घटकांवर हल्ले, ईडीचा दुरुपयोग, शिक्षण व आरोग्याची हेळसांड आणि त्यातून गरीब वर्गाचे नुकसान या सगळय़ाच्या परिणामी समाजमानस भाजपच्या विरोधात उभे ठाकले आहे. यातून मार्ग काढण्याऐवजी सरकार समाजामध्ये दुही माजवण्याच्या प्रयत्नात आहे आणि त्याचाच भाग म्हणजे घाईगर्दीतून समान नागरी कायदा प्रस्तावित करण्याचा मानस सरकारने जाहीर केला आहे.

खरे म्हणजे २१व्या कायदा आयोगाने दिलेला अहवाल बासनात बांधून २२वा कायदा आयोग गठित करण्यात आला. त्यालाही पुरेसा वेळ न देता घाईगर्दीने त्यांनी अहवाल द्यावा असे प्रयत्न चालू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समान नागरी कायदा आणणार असे जाहीर केले. परंतु त्याचा मसुदा लोकांसमोर ठेवण्यात आलेला नाही. त्यातही मुस्लीम समाजात आपल्या व्यक्तिगत कायद्यात सरकार हस्तक्षेप करू इच्छिते असे भीतीचे वातावरण तयार केले आहे. सरकारने समान नागरी कायदा संबंधीचा मसुदा दिला नाही, तरीही मुस्लीम समाजात मोठय़ा प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली आहे. आपण आपल्या स्वत्त्वाची ओळख व्यक्तिगत कायद्यात शोधतो, त्याऐवजी आपण आपल्या समाजाला काय योगदान देतो ते शोधले पाहिजे. आज ज्या क्षेत्रात मुस्लीम समाज आघाडीवर होता, तो मागे पडताना दिसत आहे. उदा. अभिजात संगीत, सिनेमा, नाटक, साहित्य, क्रीडा इत्यादी सांस्कृतिक क्षेत्रात आपण मागे का पडत आहोत, याचा विचार केला पाहिजे. धर्माशी निगडित असे कोणतेही प्रश्न निर्माण होतात तेव्हा मुस्लीम समाज जागृत होतो. शहाबानो खटल्यासंबंधात तर कसल्याही प्रकारे कुठल्याही धार्मिक कायद्यामध्ये हस्तक्षेप होत नव्हता. तलाक पीडित, वयस्कर स्त्रीला वकिली उत्तम चालत असलेल्या वकील पतीकडून महिना फक्त ५०० रुपयाची पोटगी देण्याच्या सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाने मुस्लीम समाज बिथरला! समाजाचा प्रचंड विरोध लक्षात घेऊन त्या वेळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी पोटगी संबंधातील कायद्यातून (CRPC-125) मुस्लीम समाजाला वजा केले आणि हिंदू समाजामध्ये निर्माण झालेला रोष थोपवण्यासाठी राम मंदिराचे दरवाजे उघडले गेले. मुस्लीम समाजाच्या या चुकीची आपला राजकीय अजेंडा पुढे नेण्यास भाजपला मदतच झाली. शहाबानो खटल्यासंबंधात विरोध करणाऱ्यांमध्ये शहाबुद्दिनसारखे अति शिकलेले सुशिक्षित व श्रीमंत मुस्लीम मोठय़ा प्रमाणात होते. कुठल्याही समाजाला योग्य दिशा देण्याचे काम त्यातील उच्च व मध्यम वर्गातील सुशिक्षितांनी करणे अपेक्षित असते. मुस्लीम समाजात ही प्रक्रिया आजही अभावानेच दिसते. भाजप सत्तेवर आल्यापासून मुस्लीम समाजावर वेगवेगळय़ा मार्गाने हल्ले होत आहेत. गुजरातमध्ये तर नरसंहार (GENOCIDE) झाला.

## संपादकीय »

# आघाडी अनुभवावी!

***एकपक्षीय सरकार म्हणजे मजबूत सरकार- म्हणून प्रगतीची हमी- वगैरे सांगितले जात असले तरी त्यात केवळ चलाखी आहे. वास्तव अजिबात तसे नाही..***

नाकातोंडात पाणी जाऊन बुडण्याची वेळ ज्याच्यावर येते त्याने मिळेल त्या काडीचा आधार घेतल्यास अजिबात आश्चर्य नाही. तथापि युद्धनौकेसदृश तटबंदीत तरंगणाऱ्यास अशा काडय़ांचा आधार घ्यावा लागत असेल तर ते नौकेच्या स्थैर्याबाबत तसेच नावाडय़ाच्या त्या नौकेवरील विश्वासाबाबत प्रश्न निर्माण करणारे असतेच असते. त्यामुळे गेली नऊ वर्षे दिवसागणिक बुडणे अनुभवणाऱ्या काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षीयांनी आपापल्या पक्षीय काडय़ांचा आधार शोधला असेल तर ते नैसर्गिक. त्यामुळे बेंगळूरु येथे विरोधी पक्षीयांचा 'इंडिया' आघाडी प्रयत्न आणि राजधानी दिल्लीत भाजप-स्नेहींचा 'रालोआ' पुनर्विकास प्रकल्प या दोन्हींची दखल घेणे क्रमप्राप्त. वास्तविक गेल्या निवडणुकीत स्वत:च्या बळावर ३०३ चा टप्पा ओलांडणाऱ्या भाजपस इतके दिवस कोणा सहकाऱ्याची काहीही गरज वाटत नव्हती.

**केदार शिंदे दिग्दर्शित ाई पण भारी देवाफ या मराठी चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. एकीकडे मराठी चित्रपट यशस्वी होत नाहीत अशी ओरड होत असतानाच गेल्या तीन आठवड्यांच्या कालावधीमध्ये बाई पण भारी देवाफ या चित्रपटाची जी घोडदौड सुरू आहे ती निश्चितच मराठी चित्रपट निर्माते, दिग्दर्शकांसह या क्षेत्राशी संधित सर्वच घटकांना सुखावणारी आहे.**

# मराठी प्रेक्षक पण भारी देवा

मराठी प्रेक्षकांनी ज्या प्रकारे या चित्रपटाला प्रतिसाद दिला आहे तो पाहता बाई पण भारी देवाफच्या चालीवर मराठी प्रेक्षक पण भारी देवाफ असे म्हणावे लागते. मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासातील मैलाचा दगड मानण्यात येणारे जे विविध चित्रपट आहेत त्या रांगेमध्ये आता बाई पण भारी देवाफ या चित्रपटानेही आपले स्थान पटकावले आहे. कमाईच्या बाबतीत नागराज मंजुळे दिग्दर्शित सैराटफ किंवा रितेश देशमुख याचा वेडफ या चित्रपटांनासुद्धा आगामी दिवसांमध्ये बाई पण भारी देवाफ हा चित्रपट मागे टाकेल, असे संकेत दिसत आहेत.



चित्रपटाच्या भव्य यशानंतर अर्थातच नेहमीप्रमाणे पुन्हा एकदा या चित्रपटाला यश का मिळाले याचीही चर्चा सुरू झाली आहे. खरे तर २०२३ हे वर्ष अर्धे संपल्यानंतर अगदी हाताच्या बोटावर मोजता येतील अशा चित्रपटांनी यश मिळवले आहे. या वर्षामध्ये अनेक मराठी चित्रपट जरी आतापर्यंत प्रदर्शित झाले असले तरी त्यामध्ये नाव घेण्यासारखे वेड, वाळवी, रावरंभा, महाराष्ट्र शाहीर आणि बाई पण भारी देवा अशा मोजक्या चित्रपटांनी यश मिळवले आहे. या सर्व चित्रपटांमध्ये बाई पण भारी देवाफचे यश मात्र लक्षणीय मानावे लागते. रूढ अर्थाने कोणताही हिरो-हिरोइन आणि व्हिलन या चित्रपटामध्ये नाही. पूर्ण चित्रपट महिलाप्रधान आहे. केवळ माउथ पब्लिसिटीच्या जोरावर आतापर्यंत या चित्रपटाने जोरदार घोडदौड केली आहे हे मान्य करावे लागते. अर्थात, चित्रपटाच्या आशयामध्येसुद्धा काही असेल तरच माउथ पब्लिसिटी यशस्वी ठरू शकते. केवळ लोकांनी प्रसिद्धी केली म्हणून एखादा चित्रपट यशस्वी ठरतो असेही नाही. त्या चित्रपटामध्ये जर आशय घनता आणि वेगळा विषय हे गुणधर्म असतील तर चित्रपट दीर्घकाळ चालू शकतो हेच या बाई पण भारी देवाफ या चित्रपटाने सिद्ध केले आहे. मराठी प्रेक्षक चोखंदळ आहेत आणि जर एखादा चांगला चित्रपट आला तर त्याच्या पाठीशी ठामपणे उभा राहतो हे या निमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. मराठी चित्रपटांना महाराष्ट्रातच चित्रपटगृह उपलब्ध होत नाहीत अशी ओरड होत असतानाच बाई पण भारी देवाफ या चित्रपटाच्या बाबतीत मात्र चित्रपटगृह मालकांनी काही हिंदी चित्रपट आणि इंग्रजी चित्रपट बाजूला करून चित्रपटगृहे आणि स्क्रीन उपलब्ध करून दिली आहेत हे वेगळेपणही या ठिकाणी लक्षात घ्यावे लागेल. म्हणजेच प्रेक्षकांची जर मागणी असेल तर कोणताही चित्रपटगृह मालक किंवा चालक मराठी चित्रपटांची उपेक्षा करू शकत नाही हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



वाळो जन मज म्हणोत शिंदळी ।
परि हा वनमाळी न विसंबें ॥१॥

सांडूनि लौकिक जालियें उदास ।
नाहीं भय आस जीवित्वाची ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# इर्शाळवाडीवर दु:खाचा डोंगर!

## » गावकऱ्यांचं कामस्वरूपी पुनर्वसन करणार : मुख्यमंत्री

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**रायगड जिल्ह्याच्या खालापूर तालुक्यातील इरशाळगडाच्या पायथ्याला डोंगरात वसलेल्या दुर्घटनाग्रस्त आदिवासी पाड्यावर जवळपास ४८ कुटुंबे त्यातील २८८ व्यक्तींसह राहत होती. १९ जुलै २०२३ रोजीची रात्र ही यातील अनेकांसाठी काळरात्र ठरली. जिल्ह्यात अतिवृष्टीचा रेड अलर्ट असल्याने मागच्या २४ तासात संततधार पाऊस झाला.**



या धुवाँधार पावसामध्ये जिल्ह्यात अनेक ठिकाणी परस्थिती बिकट असल्याने जिल्हा प्रशासन यंत्रणा दिवसभर महाड, पोलादपूर, खेपोली सह विविध गावात गुंतलेलीच होती. सायंकाळ नंतर पावसाचा भर ओसरेल असे वाटत असताना प्रत्यक्षात अनेक भागात मात्र जोरात वृष्टी होत होती.डोंगर दऱ्यातील आदिवासी पाड्यातील या वस्तीवर अचानक कोसळलेल्या आपत्तीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांनी धाव घेत तातडीने भेट दिली. याचा सकारात्मक परीणाम बचाव व मदत कार्यावर झाला. मदत कार्यात गुंतलेल्या लोकांचे मनोबल उंचावले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रभावित लोकांशी थेट संवाद साधून, पीडितांशी बोलत, त्यांच्या गरजा, अडचणी जाणून घेतल्या. मुख्यमंत्र्यांनी यानंतर बोलताना मृत व्यक्तींच्या कुटुबियांना ५ लाखंची मदत घोषित केली. मदत कार्य वेगात पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी प्रशासनाला दिल्या. जखमी व्यक्तींना पनवेल येथील एमजीएम हॉस्पीटल मध्ये दाखल करुन उपचार करण्यात येत आहेत, त्यापैकी किरकोळ दुखपत झालेल्यांना उपचारानंतर सोडण्यात आले आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी इर्शाळगडच्या पायथ्याशी असलेल्या दुर्घटनाग्रस्त वाडीत पाहणी करत असताना देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्या केंद्रसरकारमार्फत येणाऱ्या मदतीची माहिती दिली. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी थेट मोबाईल फोनवरुन संपर्क करत कार्याला गती देण्यासाठी चर्चा केली. यामुळे सरकारच्या पातळीवरील निर्णयांचा वेग वाढला आहे. उपमुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी विधानमंडळ अधिवेशनात सरकार करत असलेल्या उपायाबाबत संपूर्ण तपशिलवार माहिती दिली. केंद्रीय संस्थांनी तयार केलेल्या भूस्खलन होणाऱ्या यादीत या ठिकाणाचा उल्लेख नसल्याचे त्यांनी सांगितले. घटनेतील पिडीत व्यक्तींपर्यंत मदत पोहोचवण्यासाठी पहाटे मंत्री गिरीश महाजन घटनास्थळी पोहोचून परीस्थितीची गंभिरता पाहून पुढील निर्णय तात्काळ घेण्यात आले. त्यांचे पाठोपाठ उद्योगमंत्री उदय सामंत, बंदरे विकास व खणिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी देखील धाव घेत मदत कार्याच आढावा घेतला. महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या रात्रीपासूनच बचावकार्याला गती देण्यासाठी प्रशासनाच्या संपर्कात होत्या. त्यांनी जखमींची रुग्णालयात जावून भेट देखील घेतली. या नैसर्गिक आपत्तीमध्ये अडकलेल्या पिडीत लोकांची काळजी वाहताना, जखमींवर मोफत उपचार, त्यांना पुढील उपाययोजना होईपर्यंत धान्य, साखर, रॉकेल मोफत पुरवण्याची व्यवस्था केली जात आहे. यासाठी संबंधित अन्न व नागरी पुरवठा विभागाचे मंत्री छगन भुजबळ यांनी आजपासून कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

### राज ठाकरे यांनी सरकारला फटकारले

» 11 जून 2023 रोजी राज ठाकरे यांनी सांगितले होते की, यावर्षी कोकणात मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळतील असं दिसतंय... शासन-प्रशासनाने जागृत राहावं. आणि 20 जुलै 2-23 रोजी रायगडच्या इरसालवाडीवर मध्यरात्री दरड कोसळणं आणि अख्खं गाव जमीनदोस्त होणं, माणसं दगावणं हे अतिशय वेदनादायी आहे. महाराष्ट्र सरकारनं अशा नैसर्गिक दुर्घटनेत आपली माणसं मृत्युमुखी पडू नयेत म्हणून उपाययोजना करणं गरजेचं आहे. डोंगरपायथ्याशी असणाऱ्या वाडी-वस्तींचं पुनर्वसन कार्य हाती घ्यावं, पर्यावरण तज्ञांचा सल्ला घेऊन एक 'पुनर्वसन योजना' आणि डोंगरपायथ्याशी वस्ती असू नये किंवा बांधली जात असेल तर ती किती अंतरावर असावी याबाबत योजना आखावी, असे मनसेने आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे.

> इर्शालवाडी दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर कुणीही आपला वाढदिवस साजरा करू नये. पुष्पगुच्छ, होर्डींग, जाहिरातींवर खर्च न करता तो निधी इर्शालवाडी गावाच्या पूर्नउभारणी आणि ग्रामस्थांच्या मदतीसाठी उपयोगात आणावा.
>
> **- अजित पवार,** उपमुख्यमंत्री

> एनडीआरएफच्या देखरेखीखाली स्थानिक ट्रेकर्स, जवान आणि सिडकोने पाठवलेले मजूर यांच्यामार्फत बचावकार्य सुरू आहे. यासह स्नायफर डॉग स्क्वाड घटनास्थळी पोहोचला आहे.
>
> **-देवेंद्र फडणवीस ,** उपमुख्यमंत्री

# माणुसकी नसेल तर तुमची कीर्ती व्यर्थ...!

## » शरद पवार यांनी PM नरेंद्र मोदी यांना दिला उपदेशाचा डोस

। मुंबई ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये 2 महिलांची नग्न धिंड काढल्याच्या घटनेवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्ला चढवला आहे.**

माणुसकी नसेल तर तुमची कीर्ती व्यर्थ ठरते, असे ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला देत मोदींवर निशाणा साधताना म्हणालेत. मणिपूरमध्ये 2 महिलांची नग्न धिंड काढण्यात आली आहे. या घटनेचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी या घटनेवर चिंता व्यक्त केली.तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या एका विधानाचा दाखला देत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उपदेशाचे डोसही पाजले.शरद पवार आपल्या




ट्विटमध्ये म्हणाले की, माणुसकी नसेल तर तुमची कीर्ती व्यर्थ ठरते... मणिपूरमध्ये महिलांविरोधात घडलेल्या या दुर्दैवी घटनेमुळे अस्वस्थ वाटत आहे. त्यामुळे आपण सर्वांनी एकत्र येऊन मणिपूरमधील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी आवाज उठवला पाहिजे. पंतप्रधान कार्यालयासह केंद्रीय गृह मंत्रालयाने या प्रकरणी तातडीने पाऊले उचलून दोषींवर कठोर कारवाई केली पाहिजे.उल्लेखनीय बाब म्हणजे शरद पवार यांनी यापूर्वीही अनेकदा केंद्राच्या मणिपूर धोरणावर तिखट टीका केली आहे. यावेळी त्यांनी केंद्रीय गृह मंत्रालय मणिपूरमधील हिंसाचाराच्या मुद्दावर सपशेल अपयशी ठरल्याचाही आरोप केला होता. मणिपूरमध्ये गत काही महिन्यांपासून जातीय हिंसाचार माजला आहे. त्यातच एका जमावाने 2 महिलांना निर्वस्त्र करून त्यांची रस्त्यावरून धिंड काढली. यावेळी त्यांच्या गुप्तांगाना हात लावून त्यांची विटंबणाही करण्यात आली. जमाव एवढ्यावरच थांबला नाही. त्याने पीडित महिलांवर सामूहिक बलात्कारही केला. या घटनेचा व्हिडिओ व्हायरल झाल्यामुळे संपूर्ण देशात संतापाची लाट उसळली आहे.

### व्हिडिओ व्हायरल करणारा अटकेत

» यासंबंधीच्या वृत्तानुसार, मणिपूरची राजधानी इंफाळपासून अवघ्या 35 किलोमीटरवरील कांगपोकपी जिल्ह्यात ही घटना घडली. ही घटना गत 4 मे रोजीची आहे. पण त्याचा व्हिडिओ आता व्हायरल झाला. पोलिसांनी हा व्हिडिओ व्हायरल करणाऱ्याला अटक केली आहे.

# प्रत्येक वेळी शिक्षा महिलांनाच का ?

## » गँगरेपचा आरोप; फेसबुक, ट्विटरवर व्हिडिओ शेअर करू नका


। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**१५ ऑगस्ट, २०२३ रोजी भारत देश आपला ७६ वा स्वातंत्र्यदिन साजरा करेल. सुजलाम-सुफलाम राष्ट्र, समृद्ध परंपरा आणि संस्कृती असणारे राष्ट्र, ऐतिहासिक वर्षांनी समृद्ध असे राष्ट्र अशी भारताची ओळख आहे. परंतु, सध्या समाजात घडणाऱ्या विकृत घटना बघताना भारताची ही ओळख कागदोपत्री तर राहणार नाही ना, अशी शंका निर्माण होते. एका बाजूला ऐतिहासिक अशा 'चांद्रयान-३' मोहिमेचे नेतृत्व एका भारतीय महिलेने केले.**

भारताच्या एका भागातील महिलांची नग्न करून धिंड काढली जात आहे, त्यांचे व्हिडिओ प्रसारित करण्यात येत आहेत आणि तरीही पुराव्यांच्या अभावी किंवा अन्य काही करणानिमित्त गुन्हेगारांना शिक्षा होत नाही. समाजात काही घडले तरीही पहिली शिक्षा महिलांनाच का ? भारताच्या फाळणीपूर्व काळापासूनची ही वस्तुस्थिती भारत स्वतंत्र होऊन ७६ वर्षे होतील, तरीही बदलेली नाही, असे का ? ही विकृत मानसिकता कुठून येते ?भारताला नक्कीच एक समृद्ध परंपरा आहे, ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. परंतु, महिला अत्याचार भारताच्या फाळणीपूर्व काळातही झाले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यामध्येही झाले. दोन समाजांमधील वाद असतील, सामाजिक दंगली असतील तेव्हा त्या समाजातील महिलांवर अमानुष अत्याचार करण्यात आले.

लहान मुली, स्त्रिया यांना बंदिवान करून त्यांच्यावर विकृतरित्या अत्याचार करण्यात आले. महिलांची विक्री करण्यात येऊ लागली. त्यांचे दर ठरवण्यात आले. भारताची फाळणी झाल्यावरही सामाजिक तेढ निर्माण होऊन विशिष्ट समाजातील महिलांना लक्ष्य करण्यात येऊ लागले. पुरुषसत्ताक किंवा पुरुषी वर्चस्व यामुळे स्त्रीला दुय्यम स्थान मिळू लागले. याचे पडसाद केवळ वृत्तवाहिन्यांवर किंवा समाजमाध्यमांवर समजणाऱ्या घटनांपुरते मर्यादित नाही, तर घरगुती हिंसा (डोमेस्टिक व्हॉयलेन्स) ही त्यातलाच प्रकार आहे. महिलेकडून मिळालेला नकार, प्रेमभंग, महिलेने मांडलेले तिचे मत पचनी न पडल्यामुळे तिच्यावर शारीरिक-



मानसिक अत्याचार करणे, तिच्या देहाची विटंबना करणे, तिचा खून करून तिच्या शरीराचे तुकडे करणे हे तिचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावून घेण्यासारखे आहे. मुळात स्त्रीकडे उपभोगाची वस्तू पाहण्याची मानसिकता दिसते. यामध्ये पुरुषांच्या मनात असणारी श्रेष्ठत्वाची भावना, सामाजिक परिस्थिती, कौटुंबिक वातावरण कारणीभूत ठरत असते. स्त्रीकडून मिळालेला नकार आणि त्यामुळे निर्माण झालेली सूडाची भावना विकृत मानसिकतेसाठी कारण ठरते. एखादी गोष्ट मिळवण्यासाठी, इच्छापूर्तीसाठी वाटेल त्या पातळीवर जाण्याची तयारी पुरुषांमध्ये निर्माण झालेली दिसते. त्यासाठी ते तुरुंगातही जाण्यास तयार असतात. मुळात जन्मजात कोणीही गुन्हेगार नसतो. समाज त्या व्यक्तीला घडवत असतो. कुटुंबाकडूनही होणारे संस्कार महत्त्वाचे ठरत असतात. समाज माध्यमे किंवा अन्य इंटरनेटवरील संकेतस्थळांमुळे विकृतीला पोषक असा मजकूर मिळतो. 'आपण एक गुन्हा केला तर काय झालं' ही मानसिकता यामुळे निर्माण होते. गुन्ह्याशी संबंधित पर्याय, अंमलबजावणी, पळवाटा हे समाजमाध्यमांवर उपलब्ध असते. त्याचाच आधार घेत विकृतीकडे पुरुष झुकतात. एकप्रकारे कारण दृक-श्राव्य माध्यमे, समाजमाध्यमे आहेत. व्यक्ती एखादी घटना या माध्यमांवर बघते. पुरावे नष्ट करण्याचा मार्ग म्हणून खून हा पर्याय त्यांना दिसतो. यातून गुन्ह्यांची निर्मिती होते. मणिपूरमधील घटना असो किंवा प्रादेशिक पातळींवर महिलांना बदनाम करण्यासाठी त्यांचे व्हिडीओ, ध्वनिफिती, छायाचित्रे काढणे असो, यातून स्त्रीला माणूस म्हणून जगण्याचा समान हक्कच नाकारला जातो. महिलेकडे उपभोग आणि दुर्बल व्यक्ती, असाहाय्य व्यक्ती म्हणून पाहिले जाते. सामाजिक तेढ निर्माण होतात किंवा दोन समाजांमध्ये जेव्हा वादंग होतात, तेव्हा त्यातील महिला हा तुलनेने सहजसोप्पे 'लक्ष्य' ठरते.

### स्त्री ही माणूस नाही का ?

समाज हा विविध जातींमध्ये विभागला गेला. त्यानंतर काही समाजसुधारकांनी स्त्री आणि पुरुष याच दोन जाती मानल्या. परंतु, स्त्री आणि पुरुष या दोन भिन्न जाती असल्या तरी ते दोघेही माणूस आहेत. दोघांना संविधानाने समान जगण्याचा, राहण्याचा हक्क दिलेला आहे. पुरुषाला त्याचा व्हिडिओ करून बदनामी केलेली आवडत नाही, सहन होत नाही, तसे मग स्त्रीला ही होणार नाही. स्त्री ही कोणतीही सार्वजनिक मालमत्ता नाही. तिला माणूस म्हणून सन्मानाने जगण्याचा हक्क आहे. तिला आत्मसन्मान आहे. तिला भावना आहे. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना दिलेले अधिकार तिलासुद्धा आहेत. मग अशा वेळी तिला लक्ष्य करणे, अयोग्यच आणि असमर्थनीय आहे. अब्रूनुकसानी ही त्या महिलेचीही होत असते, पर्यायाने तिच्याशी संबंधित नातेवाईक, कुटुंबीय यांचीही होते. याबाबत मुंबईतील मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शुभांगी पारकर म्हणाल्या की, "पुरुष-प्रधान संस्कृती जेव्हा विकृतीचे टोक गाठते तेव्हा स्त्रीवर होणारा अन्याय अमानुष होत जातो. लैंगिक अत्याचार करून तिच्या मानवी हक्कांचा आवाज दाबला जात असताना आपला समाज मात्र शांत राहतो. आपण स्त्रियांना सक्षम तरी कसे करणार? हा सगळा होणारा भीषण छळ स्त्रियांनी मानसिकरित्या दुर्बल राहावे, भीतीत राहावे म्हणूनच केला जातो." आज महिलांनी सक्षम आणि साक्षर होण्याची गरज आहे. साक्षरतेचे उपयोजन करणेही तेवढेच आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानतेच्या मूलभूत गोष्टीच आज समाज विसरला आहे. अशा पार्श्वभूमीवर दुर्बल नव्हे तर सबल, सक्षम आणि आत्मनिर्भर होण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

# मोदींनी केली सोनियांच्या प्रकृतीची विचारपूस!

## » पंतप्रधान नरेंद्र मोदींचे विरोधी पक्षाच्या खासदारांना अभिवादन

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**संसदेत विरोधी बाकांकडे जात केली चौकशी सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या चार्टर्ड फ्लाइटचे भोपाळमध्ये इमर्जन्सी लँडिंग झाल्याच्या घटनेनंतर आज पंतप्रधान मोदींनी सोनिया गांधी यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.**

त्यांची प्रकृती ठीक असल्याचे सोनियांनी पंतप्रधानांना सांगितले. गुरुवारी, संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी, सकाळी 11 वाजता, लोकसभेचे कामकाज सुरू होण्याच्या 2 मिनिटे आधी सभागृहात आलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी विरोधी बाकांकडे गेले आणि काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी यांच्याशी चर्चा केली.

सभागृहाचे कामकाज सुरू होण्यापूर्वी ते लोकसभेत दाखल होताच सत्ताधारी पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जोरदार घोषणाबाजी करत आणि उभे राहून स्वागत केले. यानंतर पंतप्रधान विरोधी बाकांकडे गेले. विरोधी पक्षाच्या खासदारांना अभिवादन करून आणि त्यांचे अभिवादन स्वीकारताना, पंतप्रधान मोदी आधी जेडीयूचे राष्ट्रीय अध्यक्ष



राजीव रंजन सिंग उर्फ ललन सिंह यांच्याजवळ थांबले आणि त्यांच्याशी हस्तांदोलन केले आणि बोलले. त्यानंतर ते सोनिया गांधींच्या बाकाकडे गेले आणि त्यांना अभिवादन केले.

सोनिया गांधी यांनीही उभे राहून पंतप्रधानांना नमस्कार केला. पंतप्रधानांनी काही काळ थांबून सोनिया गांधी यांच्याशी चर्चा केली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. यानंतर पंतप्रधान लोकसभेतील काँग्रेस नेते अधीर रंजन चौधरी यांच्या बाकासमोर पोहोचले. दोन्ही नेत्यांनी एकमेकांना नमस्कार करत अभिवादन केले.

### कोणत्या मुद्द्यांवर होणार चर्चा

भोपाळ विमानतळावर सुमारे दीड तास थांबल्यानंतर दोघेही रात्री 9.35 वाजता इंडिगोच्या विमानाने दिल्लीकडे रवाना झाले होते. काँग्रेसच्या माजी अध्यक्षा सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांच्या चार्टर्ड विमानाचे भोपाळमधील राजा भोज विमानतळावर इर्मजन्सी लँडिंग करण्यात आले आहे.

विमानात तांत्रिक बिघाड झाला होता. या विमानाने सोनिया-राहुल बंगळुरूहून दिल्लीला जात होते. भोपाळ विमानतळावर सुमारे दीड तास थांबल्यानंतर दोघेही रात्री 9.35 वाजता इंडिगोच्या विमानाने दिल्लीकडे रवाना झाले. राहुल-सोनिया भोपाळ विमानतळाच्या व्हीआयपी लाउंजमध्ये थांबले होते. यादरम्यान भोपाळचे काँग्रेस नेते तेथे पोहोचले आणि त्यांची भेट घेतली. माजी केंद्रीय मंत्री सुरेश पचौरी, काँग्रेसचे आमदार पीसी शर्मा, कुणाल चौधरी, आरिफ मसूद आणि शोभा ओझा यांच्यासह अनेक काँग्रेस नेते विमानतळावर पोहोचले

# OMG-2 वादात!




11 ऑगस्ट रोजी प्रदर्शित होणाऱ्या अक्षय कुमारच्या OMG 2 बद्दल काही चर्चा सुरू झाल्या आहेत. सेन्सॉर बोर्डाने त्यावर बंदी घातली असून प्रदर्शन रोखल्याचेही सांगण्यात येत होते. परंतु सेन्सॉर बोर्डाला चित्रपटावर बंदी घालण्याचा अधिकार नाही, असे सेन्सॉरचे माजी अध्यक्ष पहलाज निहलानी यांनी म्हटले आहे. माजी चेअरमन पहलाज निहलानी यांच्या मते, एखादा निर्माता चित्रपट प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉर बोर्डाकडे जातो तेव्हा चार सदस्यांची परिक्षक समिती चित्रपट पाहते. यामध्ये दोन महिला आणि दोन पुरुष असतात. या समितीत एकही मंडळ सदस्य नसतो. चार सदस्यांची समिती चित्रपट पाहताना त्यांचे मुद्दे नोंदवतात. त्यांना काही आक्षेपार्ह वाटल्यास किंवा काही कट सुचविल्यास नंतर चारही सदस्य आपापसात चर्चा करून चित्रपटावर अंतिम अहवाल देतात. यापैकी ज्येष्ठ सदस्य सर्वांचे मुद्दे ऐकून निर्णय घेऊ शकतात. त्यानंतर सर्व चार सदस्य त्यांच्या अहवालांच्या आधारे चर्चा करतात आणि चित्रपटातील अंतिम कट किंवा कोणत्याही अस्वीकरणाची शिफारस करतात. कट आणि कोणते प्रमाणपत्र द्यायचे यावर चार सदस्यांचे एकमत नसेल तर अध्यक्ष स्वतः चित्रपट पाहिल्यानंतर निर्णय घेतात. यानंतर निर्मात्याला चर्चेसाठी बोलावले जाते किंवा कारणे दाखवा नोटीस दिली जाते आणि चित्रपटात कोणते बदल करायचे आहेत हे सांगितले जाते. या दरम्यान, निर्मात्याला पूर्ण संधी देखील दिली जाते. त्याला कोणत्याही कट किंवा डिस्क्लेमरवर काही आक्षेप असेल तर तो आपले म्हणणे मांडू शकतो. चारही सदस्यांना एखाद्या दृश्याबाबत आक्षेप असेल, पण निर्मात्याला तो चित्रपटात ठेवायचा असेल, तर त्यांना यावरही वाद घालण्याची संधी दिली जाते. त्यांनी युक्तिवादाने सदस्यांना पटवून दिले, तर चारही सदस्यांना पुन्हा एकदा कपात करायची की नाही यावर चर्चा करावी लागते. पहलाज निहलानी यांच्या मते, जर निर्मात्याने असे केले तर तो चित्रपट थिएटरमध्ये प्रदर्शित करू शकणार नाही. चित्रपट पाहिल्यानंतर सेन्सॉर बोर्डाच्या सदस्यांनी चित्रपटात जे कट किंवा डिस्क्लेमर प्रस्तावित केले आहेत, निर्मात्याला बदलून ते सेन्सॉर बोर्डाच्या सुधारित समितीला दाखवावे लागते. समिती मूळ चित्रपटाचे फुटेज पाहते आणि नंतर सुधारित फुटेज पाहते. एखाद्या दृश्यात सांगितलेला कट लागू झाला की नाही, संवादात बदल झाला की नाही, हे तपासते. सर्व बदलांनंतर, सुधारित समिती अंतिम चित्रपटाच्या फुटेजवर सही करून त्यावर शिक्कामोर्तब करते. चित्रपटाचा संपूर्ण रेकॉर्ड सीबीएफसीकडे असतो. प्रमाणपत्र दिल्यानंतर, चित्रपट निर्मात्याकडे डिजिटल स्वरूपात सुपूर्द केला जातो. त्याशिवाय चित्रपटात एकही अतिरिक्त फ्रेम असेल, तर तो प्रदर्शित करण्यास परवानगी नसते.

# शिल्पाच्या नवऱ्यावर पिक्चर!



बॉलीवूडची प्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी ही तिच्या फिटनेसमुळे सोशल मीडियावर चाहत्यांच्या चर्चेचा विषय असते. आज सोशल मीडियावर सर्वाधिक लोकप्रिय सेलिब्रेटी म्हणून शिल्पाचे नाव घ्यावे लागेल. वयाची चाळीशी ओलांडलेल्या शिल्पानं तिच्या फिटनेसनं चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. बॉलीवूडपासून काही काळ लांब असलेल्या शिल्पानं वेगवेगळ्या रियॅल्टी शो मधून आपली छाप उमटवली होती. गेल्या काही वर्षांपासून लोकप्रियतेच्या शिखरावर असणाऱ्या शिल्पासाठी तो काळ मात्र खूपच वेदनादायी होता. ज्यात तिच्या पतीला राज कुंद्राला अश्लील चित्रपट तयार करणे आणि त्या परदेशात प्रदर्शित करण्यासाठी अटक करण्यात आली होती. त्याला दोन महिन्याचा तुरुंगवासही ठोठावण्यात आला होता. या घटनेचे मोठे पडसाद शिल्पाच्या वैवाहिक आयुष्यावर उमटले होते. ती घटस्फोट घेणार की काय अशाही चर्चाही समोर आल्या होत्या. शिल्पानं सोशल मीडियाच्या माध्यमातून चाहत्यांची माफी मागून याप्रकरणात आपल्यावर प्रतिक्रिया देताना थोडी काळजी घ्यावी, संयम बाळगावा, झाल्या प्रकरणात आपली काही चूक नाही. असे सांगितले होते. आता शिल्पाच्या बाबत आणखी एक मोठी बातमी समोर आली आहे.

# इशिता दत्ता झाली आई




इशिता दत्ता आणि वत्सल शेठ हे टीव्ही इंडस्ट्रीतील प्रसिद्ध जोडप्यांपैकी एक आहेत. दोघांना अनेकदा एकत्र पाहिले जाते आणि ते खूप क्यूट देखील आहेत. हे दोघेही आता आई - बाबा झाले आहेत. वत्सल सेठ आणि इशिता दत्ताने 19 जुलै रोजी त्यांच्या मुलाचे स्वागत केले. 'इटाईम'च्या वृत्तानुसार, आई आणि मूल दोघेही बरे असून अभिनेत्रीला शुक्रवारी रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात येणार आहे. अभिनेत्री इशिता दत्ताने बुधवारी तिच्या पहिल्या मुलाला जन्म दिला. रिपोर्टनुसार, 'मुल आणि आई निरोगी आहेत. शुक्रवारी त्यांना डिस्चार्ज देण्यात येणार आहे. सध्या दोघांचे कुटूंब सध्या सर्वात आनंदी आहे. इशिता दत्ता नेहमीच तिच्या फॅन्स आणि फॉलोअर्सना तिच्या कौटुंबिक जीवनाबद्दल आणि तिच्या स्वभावाबद्दल अपडेट करते. तिने तिचे बेबी बंप आणि पती वत्सल दाखवणारे अनेक सेल्फी गरोदरपणात शेअर केले आहेत. 28 नोव्हेंबर 2017 रोजी 'बेपनाह प्यार' फेम अभिनेत्री इशिता दत्ताने तिचा 'बाजीगर' फेम अभिनेता वत्सल शेठसोबत लग्नगाठ बांधली. या वर्षी 31 मार्च रोजी, या जोडप्याने घोषित केले की ते त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत करण्यास तयार आहेत. तिने कलर-ऑर्डिनेटेड पोशाख घातलेला फोटो शेअर केला आहे. फोटोमध्ये वत्सल इशिताच्या बेबी बंपकडे टक लावून पाहत आहे. काही दिवसांपूर्वी इशिता दत्ताच्या आईने अभिनेत्रीसाठी बेबी शॉवरचे आयोजन केले होते. इशिताने तिच्या बंगाली बेबी शॉवरचा एक व्हिडिओ शेअर केला ज्याला सोशल मीडियावर खूप पसंती मिळाली. इशिताने फंक्शनसाठी गुलाबी रंगाची बनारसी साडी नेसली होती आणि ती खूपच सुंदर दिसत होती. व्हिडिओ शेअर करताना अभिनेत्रीने लिहिले, 'गोदभराई फंक्शन. या काही क्षणांसाठी, हार्दिक शुभेच्छा आणि आशीर्वादांसाठी सर्वांचे आभार. एकुणच आई झाल्याने इशिता दत्ता आणि वत्सल शेठ दोघेही खुप खुश आहेत.



# 'अरे हा तर गरीबांचा आयर्न मॅन'!

बाहुबली पासून चाहत्यांच्या प्रभासकडून अपेक्षा वाढल्या. काही दिवसांपूर्वी त्याचा आदिपुरुष नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यात त्यानं प्रभू श्रीराम यांची भूमिका साकारली होती. मात्र प्रेक्षकांना ती भूमिका काही आवडली नाही. त्यांनी दिग्दर्शक ओम राऊत यांच्यासह प्रभासवर टीका केली. मागील काही वर्षांपासून प्रभास हा हिट चित्रपटाच्या शोधात आहे. त्याच्या सालार, राधेश्याम नावाच्या चित्रपटांनी देखील प्रेक्षकांची निराशा केली आहे. अशात पुन्हा प्रोजेक्ट के मुळे तो चर्चेत आला आहे. सोशल मीडियावर त्याचा या चित्रपटातील नवा लूक समोर आला आहे. त्यामुळे त्याला नेटकऱ्यांच्या ट्रोलिंगला सामोरं जावं लागलं आहे. अनेकांनी त्याच्या त्या लूक्सची तुलना हॉलीवूडच्या आयर्न मॅनसोबत केली आहे. प्रोजेक्ट के हा चित्रपट यंदाच्या वर्षातील सर्वाधिक चर्चेतील चित्रपट आहे. त्यात भारतीय चित्रपट विश्वातील मोठमोठे कलाकार दिसणार आहे. त्यात प्रसिद्ध अभिनेते कमल हासन यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय दीपिका पदुकोणही प्रभाससोबत दिसणार आहे. सोशल मीडियावर प्रोजेक्ट के नावाचा ट्रेंड जोरदार सुरु आहे. अशातच नेटकऱ्यांनी प्रभासच्या

# किंग खानच्या हातात ट्रॉफी



बॉलीवूडचा किंग खान शाहरुख हा त्याच्या एका फोटोमुळे भलताच चर्चेत आला आहे. तो फोटो आहे यंदाच्या वर्ल्ड कपचा. यावर्षी भारतात वर्ल्ड कप थरार रंगणार आहे. पाच ऑक्टोबरपासून या महासंग्रामाला सुरुवात होणार आहे. यात भारताचा पहिला सामना आठ ऑक्टोबरला होणार असून हायव्होल्टेज सामना भारत VS पाकिस्तान पंधरा ऑक्टोबरला होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून आयसीसीनं वेगवेगळ्या प्रकारे वर्ल्ड कपसाठी वातावरण निर्मिती करण्यास सुरुवात केली आहे. अशात बॉलीवूडचा किंग खान शाहरुखच्या त्या फोटोनं वेगळ्याच चर्चेला सुरुवात झाली आहे. काहींनी तर शाहरुख हा आता वर्ल्ड कपचा ब्रँड ॲम्बेसिडर आहे का असा प्रश्नही आयसीसीला केला.

# फिफा विश्वचषकात गोळीबार!

## फुटबॉल विश्वचषकाच्या आयोजनावर प्रश्नचिन्ह, दोघांचा मृत्यू

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**न्यूझीलंडमधील ऑकलंडमध्ये झालेल्या गोळीबारात दोघांचा मृत्यू झाला. न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी सांगितले की, गुरुवारी महिला फुटबॉल विश्वचषक सुरू होण्यापूर्वी मध्य ऑकलंडमध्ये झालेल्या गोळीबारात दोन जण ठार झाले. मात्र, हा राष्ट्रीय सुरक्षेच्या धोक्याशी निगडीत विषय नसून स्पर्धेच्या नियोजनानुसारच स्पर्धा सुरू होईल, असे ते म्हणाले. पोलिसांनी हल्लेखोराला ठार केले आहे.**



पंतप्रधान ख्रिस हिपकिन्स यांनी न्यूझीलंडमधील गोळीबारावर शोक व्यक्त केला. नियोजनानुसार स्पर्धा पुढे होईल, असे ते म्हणाले. वृत्तसंस्थेनुसार, एका बांधकामाच्या ठिकाणी झालेल्या गोळीबारात पोलीस अधिकाऱ्यांसह सहा जण जखमी झाले आहेत. न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया एकत्र या स्पर्धेचे आयोजन करत आहेत. ऑकलंडमधील ईडन पार्क येथे महिला फुटबॉल विश्वचषकाच्या उद्घाटन सामन्याच्या काही तास आधी, शहराच्या मध्यभागी असलेल्या एका गजबजलेल्या रस्त्यावर गोळीबार झाला आहे. न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी एक विधान जारी केले की ते राष्ट्रीय सुरक्षेला धोका नाही. याशिवाय ऑकलंडमध्ये उपस्थित असलेल्या अमेरिकेच्या राष्ट्रीय संघाने एक निवेदन जारी केले की त्यांचे सर्व खेळाडू आणि कर्मचारी सुरक्षित आहेत. पोलिसांकडून सांगण्यात आले की, हल्लेखोराने बांधकाम साईटजवळ बंदूक नाचवत पुढे जात गोळीबार सुरू केला. आरोपींच्या बाजूने अनेक राउंड फायर करण्यात आले.

काही वेळाने पोलिसांनी त्याला ठार केले. न्यूझीलंडच्या पंतप्रधानांनी सांगितले की, मध्य ऑकलंडमधील लोअर क्वीन सेंटवरील इमारतीवर एक गोळीबार करत असल्याची तक्रार एका प्रत्यक्षदर्शीने फोन करुन पोलिसांना दिली. यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. या गोळीबारात दोन जणांचा मृत्यू झाला आहे, हे अत्यंत दुःखाने सांगावे लागत आहे. या घटनेत अन्य सहा जण जखमी झाल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. त्यांना ऑकलंड रुग्णालयात नेण्यात आले आहे.

### हल्लेखोर शॉटगनने सज्ज होता

पंतप्रधानांच्या वक्तव्यानुसार, हल्लेखोराकडे पंप ॲक्शन शॉटगन होती. इमारतीच्या वर पोहोचल्यावर त्याने स्वतःला लिफ्टमध्ये कोंडून घेतले. मी धाडसी न्यूझीलंड पोलिस कॉन्स्टेबल आणि महिलांचे आभार मानू इच्छितो, ज्यांनी इतरांचे प्राण वाचवण्यासाठी स्वतःला पुढे केले. सरकारने आज सकाळी फिफा आयोजकांशी चर्चा केली आहे आणि स्पर्धा नियोजित प्रमाणे पुढे जाईल. राष्ट्रीय सुरक्षेला कोणताही व्यापक धोका नाही हे मी पुन्हा सांगू इच्छितो. असे दिसते की या एकाच व्यक्तीच्या कृती आहेत. मी ऑकलंड, ऑकलंडर्स आणि जगभरातील लोकांना सांगू इच्छितो की पोलिसांनी हा धोका निष्फळ केला आहे.

# साई सुदर्शनचे दमदार शतक

## भारताचा पाकिस्तानवर 8 विकेटने विजय

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**इमर्जिंग आशिया चषक स्पर्धेत भारत-A संघाने पाकिस्तान-A संघावर 8 गडी राखून सहज विजय मिळवला. या स्पर्धेतील भारतीय संघाचा हा सलग तिसरा विजय आहे. या विजयासह टीम इंडिया पॉइंट टेबलच्या ग्रुप-बीमध्ये अव्वल स्थानावर पोहोचली आहे. दोन्ही संघ आधीच उपांत्य फेरीसाठी पात्र ठरले असले तरी टीम इंडियाचे 6 गुण आहेत.**




### विजयी संघ बांगलादेशविरुद्ध खेळेल

इमर्जिंग आशिया कपमध्ये भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ अपराजित आहेत. ब गटातील गुणतालिकेत भारत पहिल्या तर पाकिस्तान दुसऱ्या स्थानावर आहे. आजचा सामना जिंकणाऱ्या संघाची उपांत्य फेरीत बांगलादेश-अ संघाशी लढत होईल. दुसरीकडे, उपांत्य फेरीत पराभूत संघाचा सामना अ गटातील अव्वल श्रीलंकेशी होईल.

साई सुदर्शन याचे दमदार शतक आणि राजवर्धन हंगरगेकर याच्या पाच विकेटच्या बळावर भारत-अ संघाने पाकिस्तान-अ संघाचा पराभव केला. तुळजापूरचा असलेला राजवर्धन हंगरगेकर याने पाच विकेट घेत पाकिस्तानला मोठ्या धावसंख्येपासून रोखले. पाकिस्तानच्या आव्हानाचा पाठलाग करताना साई सुदर्शन याने दमदार शतक झळकावले. पाकिस्तानने दिलेले 206 धावांचे आव्हान भारताने 8 विकेट राखून सहज पार केले. साई सुदर्शन याने विजयी षटकार लगावला. साई सुदर्शन याने नाबाद 104 धावांची खेळी केली.

राजवर्धन हंगरगेकर याच्या भेदक गोलंदाजीपुढे पाकिस्तान-अ संघातील फलंदाजांची दाणादाण उडाली. राजवर्धन हंगरगेकर याने पाकिस्तानच्या पाच फलंदाजांना तंबूत पाठवले.

इमर्जिंग एशिया कप स्पर्धेत भारतीय-अ संघाच्या गोलंदाजांनी पाकिस्तान अ संघाविरोधात भेदक मारा केला. कोलंबोच्या आर प्रेमदासा स्टेडियमवर सुरू असलेल्या सामन्यात पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद हरिसने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला.

संघ पहिल्या डावात 205 धावांत सर्वबाद झाला होता. पाकिस्तानी संघाकडून कासिम अक्रम (48 धावा) याने सर्वाधिक धावा केल्या, तर शाहिबजादा फरहानने 35 धावा केल्या. मानव सुथारने 3 बळी घेतले. रियान पराग आणि निशांत संधू यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

# भारत-इंडीजमध्ये

## 100वा कसोटी सामना

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारत आणि वेस्ट इंडीज यांच्यातील दुसरा आणि अंतिम कसोटी सामना पोर्ट ऑफ स्पेन येथे खेळवला जाणार आहे. गुरुवारपासून सुरू होणारा हा सामना दोन्ही संघांसाठी खास असेल. दोन्ही संघांची कसोटीतील ही १०० वी लढत असेल. भारतीय कर्णधार रोहित शर्माने पत्रकार परिषदेत हा आकडा दोन्ही संघांसाठी खास असल्याचे सांगितले. मागील सामना आणि अलीकडच्या कामगिरीनुसार भारतीय संघ हा सामनाही जिंकेल आणि २१ व्या शतकात वेस्ट इंडीजवर आपले वर्चस्व कायम राखेल, अशी अपेक्षा आहे. भारतीय संघाने पहिला सामना डाव व १४१ धावांनी जिंकला होता. अशा परिस्थितीत फारसा बदल होण्याची आशा नाही. मात्र, जयदेव उनाडकटला दुसऱ्या कसोटीतून वगळले जाऊ शकते. दुसऱ्या सामन्यातही वेस्ट इंडीज फिरकीला अनुकूल खेळपट्टी तयार करेल, असा विश्वास आहे. त्यामुळे भारत उनाडकटच्या जागी अक्षर पटेलला संधी देऊ शकतो. या मालिकेनंतर भारत डिसेंबर-जानेवारीमध्ये द. आफ्रिकेविरुद्ध कसोटी सामने खेळेल. भारतीय क्रिकेटमध्ये लवकरच बदल होईल, असा विश्वास भारतीय कर्णधार रोहित शर्माने व्यक्त केला आहे. बदलाच्या या टप्प्यात वरिष्ठांची महत्त्वाची भूमिका असेल, असा विश्वासही व्यक्त केला. तो म्हणतो, "संघात येणारे नवे खेळाडू चांगली कामगिरी करत आहेत. या बदलात आमच्यासाठी तरुण खेळाडूंना त्यांच्या भूमिकेबद्दल सांगणे महत्त्वाचे आहे, आता ते त्या भूमिकेसाठी कशी तयारी करतात व कशी कामगिरी करतात हे त्यांच्यावर अवलंबून आहे.